पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/ ४४५/२०१०
दिनांक :- ३१/३/२०१०

प्रति,

मा. ........................................
सदस्य, क्रिडा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची सभा दिनांक ७/४/२०१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ७/४/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- १३

दिनांक :- ७/४/२०१० वेळ :- दुपारी ४ : ०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ७/४/२०१० रोजी दुपारी ४:०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दि.१७/२/२०१०, ३/३/२०१० व १७/३/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दि.१७/३/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक :- १) प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस, इक्विपमेंट्स, चिंचवड, पुणे- १९ व मे.वरदायिनि एन्टरप्रायझेस,चिंचवड,पुणे १९ यांचे नावापुढे नमुद केलेल्या तलावांची पाणीशुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाचे प्रस्तावात नमुद केलेले दरांस (मासिक दर अ.क्र.१ ते ८ तलाव एकुण र.रु.६,४४,०००/-) व पिंपळे गुरव जलतरण तलाव नवीन असल्याने, या तलावाच्या कामाचे दर मंजुर नसल्याने, या तलावाची पाणी साठविण्याची क्षमता मोहननगर,चिंचवड जलतरण तलावा इतकीच (१० लाख लिटर्स) असल्याने, त्या तलावांच्या दराने र.रु.८५,०००/- मासिक दरांप्रमाणे पिंपळे गुरव जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज करुन घेण्यास व याकामाचे संबंधित ठेकेदारांकडुन एक वर्षाचा करारनामा करुन घेण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ७/४/२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/ ४४५/२०१०
दिनांक :- ३१/ ०३/२०१०

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेले आहे.